उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

ARTHA, Poona 4

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT

Reg. No. B. 3134. Licence No. 53.

वर्ष २७ पुणें, बुधवार तारीख ६ सप्टेंबर, १९६१ अंक १७

## विविध माहिती

**तागासाठीं वाजवी किंमत**— तागासाठीं किमान किंमती ठरविण्याच्या हेतूनें भारत सरकारचें अन्नखातें व पश्चिम बंगाल सरकार ह्यांच्यामध्यें वाटाघाटी चालू आहेत. भारत सरकारचे दोन वरिष्ठ अधिकारी लवकरच ह्या कामासाठीं कलकत्त्याला जाणार आहेत. दरम्यान तागाच्या किंमती फार घसरू नये म्हणून कांहीं तातडीचे उपाय योजण्यांत येणार आहेत.

**पुरामुळें पिकांचें नुकसान**—बिहारमधील नद्यांना आलेल्या पुरामुळें ४,००० चौरस मैल क्षेत्रांतील पिकांची जबर हानि झालेली आहे. सुमारें २ कोटी रुपये किंमतीचीं पिकें नष्ट झालीं असावींत असा अंदाज आहे. गंगा नदीनें आपलें पात्र बदलल्यामुळें रेल्वेचा एक पूल निकामी होण्याचा संभव आहे. बिहार सरकारनें ह्या परिस्थितीचा विचार करण्यासाठीं एक कमिटी नेमली आहे.

**हिंदी महासागराचें संशोधन**— हिंदी महासागराच्या तळाशीं असलेल्या भूरचनेबाबत रशिअन शास्त्रज्ञांनीं संशोधन चालविलें होतें. ह्यासंबंधीचा अहवाल आतां तयार झाला आहे. हिंदी महासागराच्या तळाशीं अनेक अज्ञात पर्वत असलेले शास्त्रज्ञांना आढळून आले. सागराच्या दक्षिण तळाशीं लोखंड, मँगेनीझ, इत्यादींचे सांठेहि सापडले आहेत.

**अहमदनगरमधील दुधाचा पुरवठा**—अहमदनगर शहराला दुधाचा पुरवठा करणाऱ्या नगर जिल्हा सहकारी दूध-उत्पादक संघाचें उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे सहकारमंत्री श्री. भारदे ह्यांनीं केलें. ह्या संघातर्फे शहराला सध्यां रोज ३,००० शेर दूध बंद बाटल्यांतून पुरविण्यांत येत असतें. बाटल्या भरण्याचें काम तूर्त हातानें करण्यांत येत आहे. पुढील वर्षी निर्जंतुक दुधाच्या बाटल्या यंत्राच्या साह्यानें भरण्याचें काम चालूं होईल.

**उसाचें एकरी पीक वाढवा**—इंडिअन प्रोड्यूस असोसिएशनची वार्षिक सभा नुकतीच भरली होती. सभेंत गळिताचीं धान्यें व ऊंस ह्यांचें दर एकरीं पीक वाढविण्यावर जोर देण्यांत आला. गेल्या कांहीं वर्षांत उसाच्या लागवडीचें क्षेत्र १० टक्क्यानें वाढलें असलें तरी दर एकरी पीक मात्र ३ टक्क्यांनींच वाढलें असल्याची माहिती सांगण्यांत आली.

**दारूबंदीविषयक प्रदर्शन**—नवी दिल्ली येथें दारूबंदीविषयक प्रदर्शनाचें उद्घाटन श्री. श्रीमन्नारायण ह्यांनीं केलें. अखिल भारतीय दारूबंदीविषयक लवकरच भरविण्यांत येणाऱ्या कन्व्हेन्शनची ही पूर्वतयारी आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत दारूबंदीच्या कार्यक्रमामुळें राज्य-सरकारांना जें नुकसान सोसावें लागेल त्यांतील कांहीं भाग मध्यवर्ती सरकार सोसणार आहे.

**कामगारांसाठीं घरें**—औद्योगिक कामगारांसाठीं घरें बांधण्याचें काम आतां राज्य सरकारें करूं लागणार आहेत. परंतु हे कामगार ज्या कारखान्यांतून काम करतात त्यांच्या मालकांनीं घरबांधणीच्या कामाला लागणाऱ्या खर्चापैकीं २५ टक्के खर्च राज्य सरकारला दिला पाहिजे. कांहीं कारखानदारांना घरबांधणीच्या कामीं येणाऱ्या अडचणी दूर व्हाव्या म्हणून हा उपक्रम करण्यांत येणार आहे.

**काश्मीर राज्यांतील उद्योगधंदे**— तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत काश्मीर राज्यांत १४ नवे कारखाने काढण्याचें राज्य सरकारनें ठरविलें आहे. ह्या सर्व कारखान्यांत मिळून ५० कोटी रुपयांचें भांडवल गुंतविलें जाणार आहे. कारखान्यांतून १ लाख लोकांना प्रत्यक्ष रोजगार मिळेल. त्याशिवाय आणखी ५ लाख लोकांना अप्रत्यक्षपणें काम मिळूं लागेल असा अंदाज करण्यांत आला आहे. नव्या कारखान्यांत दोन सुताच्या गिरण्या आहेत.

**परदेशीय प्रवाशांसाठीं खास सोय**—मध्यप्रदेशांत खजुराहो, सांची आणि मंडू हीं तीन ठिकाणें ऐतिहासिक प्रेक्षणीय स्थळांपैकीं आहेत. हीं ठिकाणें पहाण्यासाठीं परदेशांतील प्रवासी मोठ्या प्रमाणावर येतात. पण येथील हवामान परदेशस्थांना पुष्कळदां तापदायक होतें. म्हणून ह्या तिन्ही ठिकाणीं हवामान सुखद राखणारीं विश्रामस्थानें बांधण्यांत येणार आहेत. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत मध्यवर्ती सरकारतर्फे तीं बांधलीं जाणार आहेत.

**विवेकानंदांच्या ग्रंथांचें भाषांतर**—रामकृष्ण मिशनच्या राजकोट येथील शाखेनें स्वामी विवेकानंद ह्यांच्या समग्र ग्रंथांचीं गुजराती भाषेंतील आवृत्ति प्रसिद्ध करण्याचें काम हातीं घेतलें आहे. विवेकानंदांच्या ग्रंथांचें गुजराती भाषेंतील हें पहिलेंच भाषांतर होईल. भाषांतराचे १२ खंड प्रसिद्ध करण्यांत येतील. हिंद सरकारनें ह्या कामासाठीं ५०,००० रुपयांची मदत दिली आहे.

**चंदनाच्या झाडांची घट**—म्हैसूर राज्यांतील चंदनाच्या लाकडाच्या उत्पादनांत दिवसानुदिवस घट होत चालली आहे. चंदनाच्या लागवडीखालीं असणारी बरीच जमीन अलीकडे अन्नधान्याच्या लागवडीसाठीं उपयोगांत आणली जाऊं लागली आहे. त्याशिवाय नदीखोरें योजनांमुळेंहि बरीच जमीन कमी होऊं लागलेली आहे. त्याचबरोबर सरकारच्या मालकीच्या चंदनाच्या तेलाच्या कारखान्यांकडून चंदनाच्या लाकडाची अधिक मागणी येत आहे.

**काथ्याच्या परदेशीय बाजारपेठा**—स्वीडन व फिनलंड ह्या देशांतील काथ्याच्या व काथ्याच्या मालाच्या बाजारपेठेची पहाणी करण्याचें काथ्या बोर्डानें ठरविलें आहे. काथ्याचा माल घेण्याबाबत ह्या देशांतील लोकांच्या आवडीनिवडी काय आहेत त्याचा अभ्यास पहाणींत करण्यांत येणार आहे. काथ्याच्या धंद्याचें भवितव्य बऱ्याच प्रमाणांत त्या वस्तूंच्या निर्यातीवर अवलंबून आहे. ह्या धंद्यांत रोजगारी मिळणाऱ्या मजुरांचें प्रमाण निर्यातीवर अवलंबून असतें.

**वाहतुकीची सहकारी संस्था**—पुढील महिन्यापासून मद्रास येथें वाहतुकीची एक सहकारी संस्था स्थापन करण्यांत येणार आहे. मद्रास राज्यांतील अशा प्रकारची ही पहिलीच संस्था आहे. संस्था प्रत्येकी ४५,००० रुपये देऊन १० वाहतुकीच्या मोटारी खरेदी करणार आहे. राज्य सरकार ४५,००० रुपये भागभांडवल घेणार असून उरलेलें १५,००० रुपये भांडवल संस्थेचे सभासद गोळा करणार आहेत.

**सिंहाच्या वसाहतीमुळें धोका**—१९५७ सालीं सौराष्ट्रामधील गिर जंगलांतील सिंहाची वसाहत वाराणसीजवळील एका जंगलांत करण्यांत आली होती. वसाहतीसाठी ३२ चौरस मैल जंगल ताब्यांत घेण्यांत आलें होतें, व इतर सोयीसाठी १ लाख रुपये खर्च करण्यांत आले होते. पण ह्या सिंहांनीं आसपासच्या खेड्यांतील गुरें मारण्याचा सपाटा चालविल्यामुळें वसाहत दुसरीकडे हलविण्यांत येणार आहे.

**अणुशक्तिकेंद्रासाठीं सहकार्य**—अणुशक्तीच्या साह्यानें वीज उत्पन्न करणारें एक मोठें केंद्र उभारण्यासाठी भारत कॅनडाच्या सहकार्यानें पहाणी करणार आहे. संकल्पित केंद्राला लक्षावधि डॉलर्स खर्च येणार आहे. नुसत्या पहाणीच्या कामालाच ५०,००० डॉलर्स खर्च येणार असून ती करण्यासाठी कॅनडा सहकार्य करणार आहे. नव्या केंद्रासाठी जागा शोधण्याचें काम सुरू आहे. केंद्र बहुधा उत्तर भारतांत उभारलें जाईल.

**तिबेटी निर्वासित नकोत ?**—तिबेटमधून आलेल्या निर्वासित कुटुंबांचें पुनर्वसन करण्यासाठी मद्रास सरकारनें उटकमंड अगर कोडाई कॅनॉल भागांत १,००० एकर जमीन उपलब्ध करून द्यावी अशी सूचना मध्यवर्ती सरकारकडून करण्यांत आली होती. परंतु इतकी जमीन त्या भागांत निर्वासितांच्या वसाहतीसाठी मिळविणें मद्रास सरकारला जड जात आहे. मद्रास सरकारनें आपली अडचण भारत सरकारला कळविली आहे.

**पश्चिम बंगालमध्यें रेशमाचा कारखाना**—पश्चिम बंगाल सरकार कच्चें रेशीम तयार करण्याचा एक कारखाना काढणार आहे. रेशमाचा दर्जा आंतरराष्ट्रीय दर्जाच्या बरोबरीचा राहील ह्यासंबंधी मुद्दाम प्रयत्न करण्यांत येतील. कारखाना मधुपूर ह्या ठिकाणीं काढण्यांत यावयाचा असून त्यामधून दरसाल २५,००० पौंड कच्चें रेशीम तयार होईल. कारखान्यांत काम करण्यासाठी ४८ मुलांना व मुलींना खास शिक्षण देण्यांत आलें आहे.

**यांत्रिक शेतीची दुसरी योजना**—राजस्थानमध्यें यांत्रिक शेतीची दुसरी मोठी योजना हातीं घेण्याचें मध्यवर्ती सरकारनें ठरविलें आहे. हें दुसरें मोठें शेत सुरतगड येथील पहिल्या मोठ्या शेताजवळच स्थापन करण्यांत येणार आहे. दुसरी शेतवाडी ३०,००० एकरांवर पसरणार आहे, व तीसाठी २ कोटी रुपये खर्च येणार आहे. शेतांत मुख्यत: मका व गहूं हीं पिकें काढण्यांत येतील. अशा प्रकारचें शेत आपल्या राज्यांत स्थापन करण्यांत यावें म्हणून राजस्थानसकट अनेक राज्यांनीं प्रयत्न चालविले होते.

**मीठ-कंपनीला तोटा**—जयपूर येथील हिंदुस्थान सॉल्ट कंपनीचा वार्षिक अहवाल व त्यावरील सरकारचें मत लोकसभेला सादर करण्यांत आलें आहे. ही कंपनी सरकारच्या मालकीची असून तिला १९५९-६० सालीं ५·८१ लाख रुपये तोटा आलेला आहे. त्याच्या मागील वर्षांत कंपनीला ४·३१ लाख रुपये नफा झाल्याचें त्या वर्षाच्या अहवालांत नमूद आहे.

**ग्रामीण भागांतील सिमेंट-पुरवठा**—ग्रामीण भागांतील बांधकामासाठी लागणारा सिमेंटचा पुरवठा अपुरा पडत आहे. ह्या तुटवड्यावर उपाय म्हणून ग्रामीण भागांतील सिमेंटच्या वांटपाचें काम सहकारी सोसायट्यांतर्फे अगर समाज-विकास योजनांच्या मार्फत करण्याचा विचार महाराष्ट्र सरकार करीत आहे. महाराष्ट्र राज्याला सर्व सिमेंट दुसऱ्या राज्यांतून आयात करावें लागतें.

**वेस्टिंग हौस कॉर्पोरेशनचा शोध**—अमेरिकेमधील वेस्टिंग हौस इलेक्ट्रिक कॉर्पोरेशनच्या संशोधनखात्यानें सूर्याच्या उन्हाच्या साह्यानें वीज उत्पन्न करणाऱ्या यंत्राचा शोध लावला आहे. ह्या यंत्राच्या साह्यानें उजेड, औद्योगिक शक्ति आणि पाणीपुरवठा स्वस्ताईनें होऊं शकेल असें म्हणतात. अप्रगत देशांतील ग्रामीण भागांतील लोकांना त्याचा विशेष उपयोग होईल.

**इटलीच्या पोलिसदलांत स्त्रिया**—रोम येथील पोलिस स्कूलमध्यें स्त्री-पोलिसांना शिक्षण देऊन तयार करण्यांत आलें आहे. चार महिन्यांच्या शिक्षणक्रमानंतर त्यांना लवकरच प्रत्यक्ष कामावर जावें लागेल. त्यांना डेप्युटी इन्स्पेक्टरचा हुद्दा देण्यांत आला आहे. इटलीच्या पोलिस दलांत आतांपर्यंत फक्त पुरुषांनाच प्रवेश असे. स्त्री-पोलिसांची भरती प्रथमच करण्यांत आलेली आहे.

**दिल्लीजवळ एंजिनिअरिंग कॉलेज**—दिल्लीजवळ ७ मैलांवर कॉलेज ऑफ एंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी ही संस्था स्थापन करण्यांत आली आहे. कॉलेजच्या कामाला नुकताच प्रारंभ करण्यांत आला. सदर कॉलेजमध्यें १५० विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय आहे. कॉलेजचा पायाचा दगड ड्यूक ऑफ एडिंबरो ह्यांनीं १९५९ सालीं बसविला होता. कॉलेज स्थापन करण्याच्या कामीं ब्रिटनचें सरकार व कांहीं कारखानदार ह्यांचें साह्य मिळालें आहे.

**हृदयविकारासंबंधीं संशोधन**—हृदयविकाराच्या रोगासंबंधीं संशोधन करणारी एक संस्था दिल्ली येथें स्थापन करण्यांत येणार आहे. लोकसभेंत ही माहिती सांगतांना आरोग्यमंत्री श्री. करमरकर म्हणाले कीं, मनावर व शरीरावर पडणाऱ्या ताणामुळें हा विकार शहरवासीयांत अधिक प्रमाणावर आढळून येतो. स्निग्ध पदार्थांच्या फाजील सेवनानें हा रोग होतो असें तज्ज्ञांचें मत आहे.

**यांत्रिक हत्यारांची तंत्रविद्या**—बंगलोर येथें यांत्रिक हत्यारांचे नमुने व तंत्रविद्या ह्यांचें शिक्षण देणारी एक स्वतंत्र संस्था काढण्याची शिफारस थॅकर कमिटीनें केली आहे. भारत सरकारनें शिफारस मान्य केली आहे. संस्थेसाठी लागणाऱ्या साधनांचा खर्च झेकोस्लोव्हाकिआ सोसणार आहे. हा खर्च सुमारें ४० लाख रु. येईल. त्याशिवाय झेक तंत्रज्ञहि पाठविण्यांत येणार आहेत.

**इंग्रजी भाषेला प्राधान्य**—कोल्हापूर येथील राजाराम कॉलेजमध्यें शिक्षण-तज्ज्ञांचा एक परिसंवाद भरविण्यांत आला होता. कोल्हापूर येथें स्थापन करण्यांत यावयाच्या शिवाजी विद्यापीठांत शिक्षणाचें माध्यम काय असावें ह्याविषयीं परिसंवादांत चर्चा करण्यांत आली. संकल्पित विद्यापीठांत मराठी अगर हिंदी ही भाषा शिक्षणाचें माध्यम न ठेवतां इंग्रजी भाषा ठेवावी असा कल परिषदेंत व्यक्त करण्यांत आला.

# अर्थ

बुधवार, ता. ६ सप्टेंबर, १९६१





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## चलनी नोटा आणि नाणीं

१९६०–६१ मध्यें १५३·२ कोटी रुपयांची चलनवाढ झाली; १९५९–६० मध्यें ती जवळजवळ तितकीच ( १५४·६ कोटी रु. ) झाली होती. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांतील एकूण चलनवाढ ५४३ कोटी रुपये भरली; पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत ती २०८ कोटी रुपये एवढी मर्यादित होती.

व्यवहारांतील खेळत्या चलनी नोटांची किंमत १३९·८ कोटी रुपयांनीं ( ७·८% ) वाढून ती १९४२ कोटी रुपयांवर गेली. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत खेळत्या चलनी नोटा ५१८ कोटी रुपयांनीं वाढल्या.

चलनी नोटांच्या ह्या वाढींत सर्व किंमतीच्या नोटांनीं भाग घेतला. फक्त १० हजार रुपयेवाल्या नोटांची संख्या वाढली नाहीं. १०० रुपयेवाल्या नोटांची लोकप्रियता सर्वांत जास्त असून, खेळत्या नोटांत त्या नोटांचें प्रमाण ४३·२% आहे. त्याचे खालोखाल १० रुपयेवाल्या नोटा खेळत्या आहेत; त्यांचें एकूण नोटांशीं प्रमाण ४०·७% पडतें. ५ रुपयेवाल्या नोटांच्या प्रसाराचें प्रमाण १०·२% असून २ रुपयेवाल्या नोटांचें १·९% आहे. मोठ्या किंमतीच्या चलनी नोटांची संख्या कमी असली, तरी त्यांची किंमत १९६०–६१ मध्यें ४·३ कोटी रुपयांनीं वाढून ती ८३ कोटी रुपये भरली. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत ह्या नोटांचा प्रसार १५·९% नें वाढला असला, तरी एकूण नोटांशीं त्यांचें प्रमाण ४·८% वरून ४·१% वर उतरलें आहे. ह्या मोठ्या किंमतीच्या नोटांत १ हजार, ५ हजार व १० हजार रुपये किंमतीच्या नोटांचा समावेश होतो.

एक रुपयाच्या नाण्याच्या प्रसारांत ( रुपयाच्या नाण्यांत एक रुपयावाल्या नोटांचाच मुख्यतः भरणा आहे; रुपयाच्या नोटांना रुपयेच समजले जाते. ) १०·५ कोटी रुपयांची वाढ झाली. १९६०–६१ अखेर १४२ कोटी रुपयांचीं नाणीं ( म्हणजे मुख्यतः नोटाच ) प्रचारांत होतीं. रिझर्व्ह बँकेनें चलनी नोटांना तारण म्हणून रुपये बाळगावे लागतात. असे १२० कोटी रुपये ( म्हणजे मुख्यतः नोटाच ) चलनी नोटांना तारण म्हणून ठेवलेले आहेत.

लहान नाण्यांच्या प्रसारांत १९६०–६१ मध्यें २·९ कोटी रुपयांची वाढ दिसून आली. जुनीं नाणीं झपाट्यानें प्रचारांतून कमी होत गेलीं आणि त्यांची जागा नवीं दशमान नाणीं घेऊं लागलीं. १९५८–५९ मध्यें २·२४ कोटी रु. ची, १९५९–६० मध्यें ३·७६ कोटी रु. ची आणि १९६०–६१ मध्यें ७·९४ कोटी रु. चीं दशमान नाणीं प्रचारांत आलीं. १९६०–६१ मध्यें ७९·३ कोटी दशमान नाणीं टांकसाळींत तयार करण्यांत आलीं. त्यांची किंमत ५·६ कोटी रुपये भरली. अशा रीतीनें टांकसाळींत १९५६–५७ पासून पाडलेल्या दशमान नाण्यांची संख्या ४२७·९ कोटी होऊन त्यांची किंमत १९·१ कोटी रु. झाली. गेल्या सहा वर्षांत, भारतानें एकहि रुपयाचें नाणें टांकसाळींत तयार केलेलें नाहीं; ह्यावरून रुपयाच्या 'नाण्यां'तील छापील नोटांच्या प्रमाणाची कल्पना येईल.

## गेल्या वर्षी राष्ट्रीय उत्पन्नांत ६·५ टक्क्यांनीं वाढ

भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नांत १९५९–६० पेक्षा १९६०–६१ मध्यें ६·५ टक्क्यांनीं निव्वळ वाढ झाल्याचें दिसून येतें.

राष्ट्रीय उत्पन्नांत झालेल्या ह्या वाढीपैकी २·७ टक्के वाढ शेतकी क्षेत्रांत झाली असून बाकीची ३·८ टक्के वाढ अन्य क्षेत्रांत झाली आहे. कांहीं थोडयाफार प्रमाणांत मिळालेल्या माहितीच्या आधारें हा अंदाज तयार करण्यांत आला असल्यानें यंदा वर्ष-अखेर प्रसिद्ध होणाऱ्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या वार्षिक पत्रकांत या आंकडयांत बदल होण्याची शक्यता आहे.

खालील तक्त्यांत देण्यांत आलेलें १९५०–५१ व १९५५–५६ ते १९६०–६१ या वर्षांतील राष्ट्रीय व दरमाणशीं उत्पन्नाचे आंकडे १९४८–४९ मधील किंमतमानावर आधारलेले आहेत :—

| आर्थिक वर्ष | १९४८–४९ च्या किंमतीप्रमाणें राष्ट्रीय उत्पन्न ( आंकडे १०० कोटी रु. चे ) | १९४१, १९५१ व १९६१ च्या शिरगणती-प्रमाणें १९४८–४९ च्या किंमती मूळ प्रमाण धरून दर डोई उत्पन्न ( आंकडे रु. चे ) |
|---|---|---|
| १९५०–५१ | ८८·५ | २४७·५ |
| १९५५–५६ | १०४·८ | २६७·८ |
| १९५६–५७ | ११०·० | २७५·६ |
| १९५७–५८ | १०८·९ | २६७·४ |
| १९५८–५९ | ११६·५ | २८०·२ |
| १९५९–६० ( प्राथमिक ) | ११७·६ | २७६·९ |
| १९६०–६१ ( तात्पुरता ) | १२५·३ | २८८·८ |

पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत राष्ट्रीय उत्पन्नांत १८·४ टक्क्यांनीं तर दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत १९·६ टक्क्यांनीं वाढ झाली. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत दरवर्षी राष्ट्रीय उत्पन्नांत सरासरी ३·९ टक्के वाढ झाली होती. त्याचा विचार करतां १९६०–६१ या वर्षांत झालेली ६·५ टक्क्यांची वाढ ही उल्लेखनीय म्हणावी लागेल.

## महाराष्ट्रांतील धरणांचें ब्रिटिश कंपनीस कंत्राट

मुंबईजवळील शिरवटा धरण अधिक मजबूत करण्याबाबतचें काम टाटा हैड्रोइलेक्ट्रिक पॉवर सप्लाय कंपनीनें ब्रिटनमधील सिमेन्टेशन कंपनी लि. कडे सोंपविलें आहे. हें कंत्राट सुमारें २७,०,००० पौन्डांचें आहे.

अडीच वर्षांपूर्वी टाटा कंपनीनें याच ब्रिटिश कंपनीस वळवण धरणाचे सांधे भरण्याचें सुमारें १,००,००० पौंडांचें काम दिलें होतें. त्यानंतर गेल्या वर्षी तें धरण मजबूत करण्याचें व शिरवटा धरणाचे सांधे भरण्याचें सुमारें ४,००,००० पौन्डांचें कामहि या ब्रिटिश कंपनीनें केलें.

हें नवें काम तावडतोब सुरू होऊन १९६३ च्या मध्यांत संपेल असा अंदाज आहे.

## भारतीय चित्रपटांच्या आयातीस बंदी

पाकिस्तानांतील बोलपटव्यवसायाची वस्तुस्थितिनिदर्शक माहिती मिळविण्यासाठी पाकिस्तान सरकारनें एका कमिटीची नमणूक केली होती. पाकिस्तानमधील बोलपटाच्या धंद्याला भारताच्या बोलपटांची स्पर्धा अतिशय जाणवते. म्हणून निदान ५ वर्षे तरी भारतीय बोलपट पाकिस्तानांत आयात करण्यास संपूर्ण बंदी करण्यांत यावी अशी शिफारस कमिटीनें आपल्या अहवालांत केली आहे. भारतीय बोलपट आयात करण्याबाबत सध्यां भारत व पाकिस्तान ह्यांच्यांत असलेल्या कराराप्रमाणें दरसाल फक्त १० हिंदी व ऊर्दू बोलपट पाकिस्तानांत आयात करण्यांत येतात. हे बोलपट कांहीं विशेष चांगल्या प्रतीचे नसतात. तरी सुद्धां पाकिस्तानांतील बोलपट–निर्मात्यांना त्यांची स्पर्धा नको आहे. पाकिस्तानांत भारताच्या बोलपटांना अतिशय मागणी आहे. भारतामधील १० वर्षांपूर्वींचे चित्रपटहि पाकिस्तानांतील चित्रगृहांतून कित्येक महिने चालतात. इतकेंच काय, पण अगदीं खराब झालेले जुने चित्रपट पहाण्याससुद्धां चित्रगृहांतून तोबा गर्दी होत असते. भारतामधून बोलपट आयात केल्यामुळें, पाकिस्तानांतील ह्या धंद्यांतील भांडवलदार वर्ग स्वतंत्र चित्रपट काढण्याची उत्सुकता दाखवीत नाहीं, असा आरोपहि करण्यांत येत आहे. भारतीय चित्रपट चित्रगृहांत दाखवून ह्या वर्गाला अधिक नफा राहतो, असा अनुभव आहे. ह्या परिस्थितीमुळें भारतीय चित्रपटांच्या आयातीवर बंदी घालण्यासंबंधीच्या प्रचारास अलीकडे जोराची धार आली आहे. पाकिस्तानांत दरसाल सुमारें ३० चित्रपट काढण्यांत येतात. पण चित्रगृहापर्यंत पल्ला मारण्यास त्यांना वाट पहात बसावें लागतें, आणि इतकेंहि करून चित्रपट दाखविला गेल्यास तो बहुधा अपयशी ठरतो. म्हणून चित्रगृहांचे मालक व वितरक ह्यांना ते नको असतात.

## रणगाडे तयार करण्याचा कारखाना उभारणार

भारत सरकार आणि ब्रिटनमधील व्हिकर्स–आर्मस्ट्रॉंग कंपनी ह्यांच्या दरम्यान भारतांत रणगाडे तयार करण्यासंबंधीच्या करारावर सह्या करण्यांत आल्या आहेत. हा कारखाना जबलपूर येथें उभारण्याचा विचार प्रथम करण्यांत येत होता. परंतु तांत्रिक कारणांसाठी तो मद्रासजवळ आवडी ह्या ठिकाणीं काढण्याचें आतां ठरविण्यांत आलें आहे. आवडी येथें उभारण्यांत यावयाच्या कारखान्यांत ३७ टन वजनाचे १,००० रणगाडे तयार करण्यांत यावयाचे आहेत. पहिले ४० रणगाडे ब्रिटनमध्येंच तयार करण्यांत येणार आहेत. नंतर रणगाड्यांचे सुटे भाग आवडी येथें पाठविण्यांत येतील व तेथें त्यांची जुळणी करण्यांत येईल. जुळणीच्या कामांत पुरेसा अनुभव आल्यावर शक्य तितके कमी परदेशी भाग वापरून संपूर्ण रणगाडे तयार करण्यांत येतील. व्हिकर्स आर्मस्ट्रॉंग कंपनीला प्रत्येक तयार रणगाड्यामागें २५० पौंड रॉयल्टी देण्याचें भारत सरकारनें कबूल केलें आहे. त्याशिवाय रणगाड्यांच्या तोफा, एंजिनें व इतर सामान ह्यांच्यावरहि रॉयल्टी देण्यांत येणार आहे. कारण, व्हिकर्स आर्मस्ट्रॉंग कंपनीशीं सहकार्य करणाऱ्या इतर कंपन्यांकडून हें सामान घ्यावें लागणार आहे. रणगाडे तयार करण्यासाठी पश्चिम जर्मनीमधील एका कंपनीशींहि सरकारच्या वाटाघाटी चालू होत्या. परंतु व्हिकर्स–आर्मस्ट्रॉंग कंपनीच्या अटी जर्मन कंपनीपेक्षा अधिक चांगल्या वाटल्यानें त्या कंपनीशीं करार करण्यांत आला. कांहीं वर्षांनंतर आवडी येथील कारखान्यांत रणगाड्यांशिवाय इतर प्रकारच्या लष्करी मोटारगाड्याहि तयार होऊं लागतील. भारताच्या संरक्षणव्यवस्थेंतील एक फार महत्त्वाचा कारखाना म्हणून आवडी येथील कारखाना माहीत होईल.

## आरे गौळवाड्याच्या बाटल्यांची फूटतूट

गेल्या कांहीं वर्षांत भारतामधील शहरांची लोकसंख्या झपाट्यानें वाढली आणि त्याचबरोबर अनेक नवनवे प्रश्न उपस्थित झाले. मोठ्या शहरांना करावयाचा दूधपुरवठा हा अशाच प्रश्नांपैकी एक आहे. मुंबई शहराला दूधपुरवठा करण्यासाठी आरे येथील गौळवाड्याची स्थापना करण्यांत आली. ह्या गौळवाड्याच्या कारभारांतील फूटतूट होणाऱ्या दुधाच्या बाटल्यांची कहाणी उद्बोधक आहे आणि तितकीच विचार करावयास लावणारी आहे. आरे दूधपुरवठा योजनेचे डायरेक्टर श्री. शर्मा ह्यांनीं अशी माहिती सांगितली आहे कीं, दूधपुरवठ्याच्या बाटल्यांपैकी सुमारें २,५०० बाटल्या रोज फुटतात अगर हरवतात. हा आंकडा विस्मय वाटण्यासारखा आहे. ह्याचा अर्थ असा कीं, दर वर्षाला सुमारें ९ लाख बाटल्या अशा रीतीनें नाहींशा होतात. नाहींशा झालेल्या बाटल्यांच्या जागीं पुन्हां नव्या बाटल्या आणणें अपरिहार्यच आहे. त्याशिवाय दुधाचा पुरवठा सुसूत्रपणें करणें शक्य होणार नाहीं. नाहींशा झालेल्या बाटल्यांच्या जागीं नव्या बाटल्या पुरविण्यासाठी दरसाल ३,५०,००० रुपये आरे गौळवाड्याला खर्च करावे लागतात. मुंबई शहराला दररोज १० लाख दुधाच्या बाटल्या पुरवाव्या लागतात असा अंदाज आहे. इतक्या बाटल्या दरसाल कां फुटतात अगर हरवतात असा प्रश्न साहजिकच उपस्थित होतो. निष्काळजीपणा हें एक कारण असूं शकेल. कदाचित् सरकारी मालकीच्या मालमत्तेविषयीं अनास्थाहि असूं शकेल. मौज अशी कीं, अर्धवट फुटलेल्या कांहीं बाटल्यांचा पुष्पपात्रें म्हणूनहि उपयोग करण्यांत येतो असें आढळून आलें आहे. कांहींहि असलें तरी सार्वजनिक मालमत्तेचा इतक्या मोठ्या प्रमाणावर नाश होणें इष्ट नव्हे.

## कापडाच्या नव्या गिरण्यांची उभारणी

तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत कापडाच्या नव्या गिरण्या उभारण्यासाठी भारत सरकारनें २० लाख चात्या मंजूर केलेल्या आहेत. ह्या चात्यांचें वांटप निरनिराळ्या राज्यांत कसें करावयाचें ह्यासंबंधींचा तात्पुरता निर्णय घेण्यांत आला असून राज्य सरकारांना त्यांच्या हिश्शाच्या चात्यांची माहिती देण्यांत आली आहे. महाराष्ट्र, गुजरात व मद्रास ह्या राज्यांत् लोकसंख्येच्या मानानें चात्यांची व मागांची संख्या अधिक आहे. म्हणून ह्या प्रत्येक राज्यासाठी ५०,००० नव्या चात्या मंजूर करण्यांत आल्या आहेत. ह्या राज्यांतून फक्त निर्यातीस लागणारें कापड तयार करण्यासाठी ५ नव्या गिरण्या उभारण्यांत येणार आहेत. त्यांना लागणाऱ्या चात्याहि ह्या ५० हजारांतच जमा आहेत. आंध्र, बिहार, ओरिसा व उत्तर प्रदेश ह्या राज्यांतून चात्या आणि माग ह्यांची संख्या फारच कमी आहे. म्हणून ह्या प्रत्येक राज्यासाठीं २·२५ लाख चात्या मंजूर करण्यांत आल्या आहेत. आसाम, केरळ, मध्यप्रदेश, पंजाब आणि राजस्थान ह्या राज्यांना प्रत्येकीं १·५० लाख चात्या मंजूर करण्यांत आल्या आहेत. म्हैसूर आणि पश्चिम पंजाब ह्या राज्यांसाठी प्रत्येकी ७५,००० चात्या मंजूर केलेल्या आहेत. मणिपूर आणि त्रिपुरा ह्या भारत–सरकार शासित प्रदेशांसाठी प्रत्येकी ५०,००० चात्या मिळणार आहेत. सध्यां चालू असलेल्या कांहीं-कापड गिरण्यांमधून सूत कातणाऱ्या चात्यांची व मागांची संख्या प्रमाणशीर नाहीं. कांहीं गिरण्यांतून चात्या जास्त तर माग कमी, व कांहींतून चात्या कमी व माग जास्त अशी परिस्थिति आहे. ह्या बाबतींत मेळ घालतां यावा म्हणून आणखी १० लाख चात्या चालू कापड-गिरण्यांना देण्यांत यावयाच्या आहेत.

## भारताची आर्थिक परिस्थिति

(रिझर्व्ह बँकेचा १९६०–६१ चा अहवाल)

औद्योगिक उत्पादनांत बरीचशी वाढ, शेतीच्या, विशेषतः अन्न-धान्यांच्या उत्पादनांत सुधारणा, गुंतवणुकींत वाढ, राष्ट्रीय उत्पन्नांत वाढ, हीं भारताच्या १९६०–६१ मधील चांगलीं वैशिष्ट्यें होत. पण, महागाईत वाढ, परराष्ट्रीय येण्यादेण्यांतील प्रतिकूल तफावत आणि जरूरीच्या मानानें अपुरी साधनसंपत्ति, ह्याहि गोष्टी ठळकपणें दिसून आल्या. पैशाचा पुरवठा वाढला, बँकांनीं कर्जें अधिक दिलीं, पण पैशाची तंगी कायमच राहिली.

औद्योगिक उत्पादन १२·१% नें वाढलें; १९५९ मधील उत्पादनवाढ ८·७% होती. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांतील औद्योगिक उत्पादनाचा इंडेक्स ३९·१ नें चढला. शेतीच्या उत्पादनानें १९५८–५९ मध्यें उच्चांक गांठला होता. १९५९–६० मध्यें तें कमी झालें. शेतीच्या उत्पादनाचा इंडेक्स (१९४९–५० = १००) १३२·३ वरून १२७·२ वर उतरला; म्हणजे त्यांत ३·९% चा उतार झाला. अन्नधान्याचें उत्पादन मात्र १९५८–५९ मधील उत्पादनापेक्षाहि अधिक भरेल. ताग खेरीज बाकीचीं व्यापारी पिकेंहि अधिक उत्पादक ठरलीं.

घाऊक किंमतीचा इंडेक्स (१९५२–५३ = १००) ७·२% नें वरती गेला. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत महागाई ३०% नें वाढली.

निर्गतींत जवळ जवळ कांहींच वाढ न होता आयातीप्रीत्यर्थ मात्र ज्यास्त रकमा द्याव्या लागल्या. त्यामुळें, आयात–निर्गतीमध्यें ३६५ कोटी रुपयांची प्रतिकूल तफावत पडली; १९५९–६० मध्यें ती १८३ कोटी रु. होती. परदेशीं मदत ४०० कोटी रुपयांपेक्षा ज्यास्त येऊनहि, आपल्या परदेशांतील शिलका आणखी ५९ कोटी रुपयांनीं घटल्या; गेल्या वर्षीची घट १६ कोटी रुपयांची होती.

९७० कोटी रुपयांचीं परदेशी कर्जें व मदती १९६०–६१ साठीं मिळविण्यांत आलीं; म्हणजे, अशी कर्जाची व मदतीची रक्कम २,५६९ कोटी रु. झाली. मार्च, १९६१ नंतर वापरण्यासाठीं १,२९५ कोटी रु. चीं कर्जें व मदत उपलब्ध आहे.

## आयुर्विमा कॉर्पोरेशनची गुंतवणूक

३० जून, १९६१ अखेर संपलेल्या वर्षात आयुर्विमा कॉर्पोरेशननें गुंतविलेल्या पैशाची तपशीलवार माहिती मिळण्यासंबंधीं राज्यसभेंत एका सभासदानें प्रश्न विचारला होता. अशी माहिती देणें कॉर्पोरेशनच्या हिताच्या दृष्टीनें इष्ट ठरणार नाहीं, असें उत्तर सरकारतर्फे देण्यांत आलें. शिवाय, ही माहिती जाहीर करण्यांत आल्यास शेअरबाजारावर अनिष्ट परिणाम होण्याचा संभव आहे असेंहि कारण सांगण्यांत आलें.

## तिसऱ्या पंचवार्षिक योजनेवर श्री. राजगोपालाचारी ह्यांची टीका

भारताचे पहिले गव्हर्नर जनरल श्री. राजगोपालाचारी ह्यांनीं तिसऱ्या पंचवार्षिक योजनेवर टीका करणारा एक लेख लिहिला आहे. आपल्या लेखांत ते म्हणतात कीं योजनेंत ११,६०० कोटी रुपये खर्च करण्याची तरतूद आहे. ही तरतूद भव्य आहे. पण तीमुळें योजनेचा गाभा हळूहळू येणाऱ्या दिवाळखोरीनें कुरतडला जाण्याची भीति आहे. आजच भारताच्या परदेशीय देण्यांची स्थिति विकट झालेली आहे. वेळोवेळीं आणखी परदेशीय मदत मिळवूनच तिला तोंड द्यावें लागत आहे. सध्यां जगांत शीतयुद्धाचें वातावरण आहे. त्याचा फायदा घेऊन परदेशाकडून मोठमोठालीं कर्जें घेऊन तीं कोणालाच जबाबदार नसणाऱ्या उधळ्या संचालकांच्या हवालीं करण्यांत येत आहेत. सार्वजनिक मालकीच्या नांवाखालीं हें सर्व चालू आहे. पुढील सालासाठीं अंमलांत यावयाच्या चवथ्या, पांचव्या व कदाचित् सहाव्या पंचवार्षिक कार्यक्रमालाहि ह्याच चाकोरींतून जावें लागणार असे दिसत आहे. लोकांवर अधिक जबर कर बसविण्यांत येत आहेत व किंमती एकसारख्या झपाट्यानें वाढत चालल्या आहेत. त्याचबरोबर रोज लागणाऱ्या वस्तूंची टंचाई वाढत चालली असून लोकांच्या दैनंदिन जीवनावर वरिष्ठ नोकराचा पगडा बसत चालला आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत नमूद करण्यांत आलेलीं उद्दिष्टें वाचण्यास मोठीं आकर्षक आहेत. पण, अत्यंत जाचक निर्बंधाशिवाय समाजवाद आणणारा असा हा कार्यक्रम आहे. हा दावा मान्य होण्यासारखा नाहीं. खरी स्थिति अशी आहे कीं, ही गोष्ट शक्यच नाहीं. करांची अपरिहार्य लादणी आणि खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांना ठाकूनठोकून विशिष्ट चौकटींत बसविल्याखेरीज हीं उद्दिष्टें साध्य होण्यासारखीं नाहींत. कर कमी करणें आणि बचतीला व भांडवलगुंतवणुकीला वाव देणें ह्यांची आज आत्यंतिक गरज आहे.

## उद्योगविनिमय केंद्रांची कामगिरी

भारतांत सरकारचीं एकूण २९६ उद्योगविनिमय केंद्रें असून त्यांचा उपयोग करणारे ८,८०७ मालक आहेत. ह्या केंद्रांतून नोकरीसाठीं नांवें नोंदविणारांची संख्या सालोसाल वाढत आहे, पण त्या मानानें नोकऱ्या मिळत नाहींत असें खालील आंकड्यांवरून दिसून येईल. १९५० सालीं नोंदविलेल्या अर्जदारांपैकीं २५% अर्जदारांना केंद्रामार्फत नोकऱ्या मिळाल्या; १९६० सालीं हें प्रमाण ११% वर उतरलें. अर्जदारांच्या संख्येच्या वाढीच्या मानानें उपलब्ध नोकऱ्या नाहींत, असा त्याचा अर्थ होतो.

| वर्ष | केंद्रांची संख्या | नोंदलेले अर्जदार | दिलेल्या नोकऱ्या | रजिस्टरवरील शिलकी अर्जदार | केंद्रांचा उपयोग करणारे मालक | केंद्राला कळविलेल्या रिकाम्या जागा |
|---|---|---|---|---|---|---|
| १९५० | १२३ | १,२१०,३५८ | ३३१,१९३ | ३३०,७४३ | ५,५६६ | ४१९,३०७ |
| १९५५ | १३६ | १,५८४,०२४ | १६९,७३५ | ६९१,९५८ | ४,८८० | २८०,५२३ |
| १९५६ | १४३ | १,६६९,८९५ | १८९,८५५ | ७५८,५०३ | ५,४३६ | २९६,६१८ |
| १९५७ | १८१ | १,७७४,६६८ | १९२,८३१ | ९२२,०९९ | ५,६३२ | २९७,१८८ |
| १९५८ | २१२ | २,२०३,८८८ | २३३,३२० | १,१८३,२९९ | ६,४८५ | ३६४,८८४ |
| १९५९ | २४४ | २,४७१,५९६ | २७१,१३१ | १,४२०,९०१ | ७,४५० | ४२४,२९३ |
| १९६० | २९६ | २,७३२,५४८ | ३०५,५५३ | १,६०६,२४२ | ८,८०७ | ५२०,३३० |

# दि युनायटेड वेस्टर्न बँक लिमिटेड

## हेड ऑफिस–सातारा.

स्थापना : १९३६ ] [ शेडयूल्ड बँक.

भारत सरकार व रिझर्व्ह बँक यांचे आदेशानुसार

## दि सातारा स्वदेशी कमर्शिअल बँक लिमिटेड

ही आमच्या बँकेंत दिनांक ६ सप्टेंबर १९६१ पासून विलीन होत असून त्यांचेकडील सातारा (हेड ऑफिस) आणि कराड, ओगलेवाडी, मसूर, कोरेगांव, करमाळा आणि उंब्रज या शाखांकडील व्यवहार आमच्या तेथील नवीन शाखेमार्फत सुरू होत असून

**ठेवीदारांची संपूर्ण रक्कम विलिनीकरणाच्या योजनेनुसार आमचेकडे वर्ग होत आहे.**

कै. पूज्य विमामहर्षि अण्णासाहेब चिरमुले यांनीं स्थापन केलेल्या या दोन बँका आतां एकत्र येत आहेत.

आम्ही आमच्या नवीन सर्व ठेवीदारांचें मोठ्या आनंदानें स्वागत करीत असून त्यांना आश्वासन देत आहोंत कीं, त्यांचे बँकिंगचे सर्व व्यवहार आमचेकडे कार्यक्षमतेनें, तत्परतेनें व नम्रतेनें केले जातील.

दि सातारा स्वदेशी कमर्शिअल बँकेच्या सभासदांना अग्रहक्काच्या शेअर्सची पूर्ण रक्कम लवकरच परत करण्यांत येत आहे.

### बँकेच्या प्रगतीचे आंकडे

| | | | |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल : | ... | ... | रु. ६,५०,००० |
| गंगाजळी : | ... | ... | रु. ४,३०,००० |
| ठेवी : | ... | ... | रु. २,८७,००,००० |
| खेळतें भांडवल : | ... | ... | रु. तीन कोटींहून अधिक |
| शाखा :— | ... | ... | २१ |

व्याजाचे दर :—

**चालू खातें — अर्धा टक्का. : सेव्हिंग्ज् बँक — तीन टक्के.**

मुदत ठेवी :—एक ते पांच वर्षे मुदतीनें चार ते पांच टक्के दरानें स्वीकारल्या जातात.

अल्प मुदतीच्या ठेवी आकर्षक व्याजाच्या दरानें स्वीकारल्या जातात.

बँकेची २२ सावी शाखा सातारा रोड येथें दि. १-१०-१९६१ रोजीं शेठ लालचंद हिराचंद यांचे हस्तें थाटानें सुरू होत आहे.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

सी. ह. जोशी, जनरल मॅनेजर.

शं. ह. साठे, चेअरमन.

**पुढील वर्ष रौप्य महोत्सवाचें**

**हरद्वारजवळील कारखाना**— हरद्वारनजीक विजेची भारी यंत्रसामग्री तयार करण्याचा कारखाना रशिआच्या मदतीनें काढण्यांत यावयाचा आहे. कारखान्याच्या उभारणीसाठी ५० कोटी रुपये भांडवल लागणार आहे. कारखान्याला लागणाऱ्या जागेची निवड आतां करण्यांत आली आहे. सुमारें ११ चौरस मैल जागा सरकारनें ताब्यांत घेण्याचें ठरविलें आहे. ह्या भागांत लागवड न करण्याच्या सूचना शेतकऱ्यांना देण्यांत आल्या आहेत.

**कागदाच्या कारखान्यासाठीं पाहणी**— जम्मू प्रांतांत कागदाच्या कारखाना काढण्याच्या शक्यतेची पहाणी करण्यासाठी कांहीं रशिअन तज्ज्ञ लवकरच काश्मीरला येणार आहेत. जम्मूच्या चिनाब नदीच्या खोऱ्यांत कागद तयार करण्यासाठी लागणाऱ्या लगद्याला उपयोगी पडतील अशीं भरपूर झाडें आहेत. ह्या कारखान्यासाठी लागणारी यंत्रसामग्री रशिआकडून मिळू शकेल.

**दिल्लीमधील औद्योगिक प्रदर्शन**—येत्या नोव्हेंबर महिन्यांत दिल्ली येथें हिंदी उद्योगधंद्यांचें एक प्रदर्शन भरविण्यांत येणार आहे. ह्या प्रदर्शनांत १८ परदेश भाग घेतील अशी अपेक्षा आहे. भारतामधील १२५ कारखान्यांनीं त्यांत भाग घेण्याचें ठरविलें आहे. प्रदर्शनासाठी राखून ठेवण्यांत आलेली सर्व जागा आतांच संपली आहे.

**इटलींतील तरुणांचा उद्योग**—उत्तर इटलींत कांहीं तरुणांनीं अग्निबाणाच्या साह्यानें एक मांजर ५,००० फूट उंच पाठविण्यांत यश मिळविलें. नंतर तें रॉकेट फुटलें. मांजर अर्थातच मेलें. इटलींत जीव दया संघ नाहीं. परंतु ह्या अग्निबाणांचा विमानांना उपद्रव होण्याचा संभव असल्यानें पोलिसांची परवानगी घेतल्याशिवाय आतां अग्निबाण उडवता येणार नाहींत.

**निरनिराळ्या पिकाखालील जमिनी**—लोकसभेंत साखरेच्या धंद्याबद्दल वादविवाद चालू असतां साखरेचा देशांतर्गत खप वाढविण्यासाठीं किंमती कमी करण्यांत याव्या अशी सूचना करण्यांत आली होती. सूचनेला उत्तर देतांना अन्नमंत्री श्री. स. का. पाटील म्हणाले कीं, अशा तऱ्हेचा उपाय योजण्याचा सरकारचा विचार नाहीं. त्याचप्रमाणें उसाच्या किंमतींत कपात करण्याचाहि विचार नाहीं. शेतीचीं पिकें आणि अन्नधान्याचीं पिकें ह्यांच्या खालील असणाऱ्या जमिनींत समतोलपणा असावा म्हणून कायदे करण्याचा अधिकार राज्य सरकारांना देण्याचा विचार करण्यांत येत आहे. असा समतोलपणा शेतीच्या अर्थव्यवस्थेला उपकारक होईल.

**भिलई येथील कारखान्याचा विस्तार**— मध्य-प्रदेशांतील भिलई येथें काढण्यांत आलेल्या पोलादाच्या कारखान्याचा विस्तार करण्याचें काम चालू वर्षअखेर हातीं घेण्यांत येईल. सध्या कारखान्यांत दरसाल १० लाख टन पोलाद निर्माण होऊं शकतें. विस्तारयोजना पूर्ण झाल्यावर २५ लाख टन पोलादाची निर्मिति होऊं लागेल. विस्तारयोजनेचें सर्व काम भारतीय एंजिनिअर्स राशिअन तज्ज्ञांच्या देखरेखीखाली करणार आहेत. योजनेचा तपशीलवार अहवाल रशिआकडून नुकताच आला आहे. भिलई येथील कारखान्याच्या निरनिराळ्या विभागांत हिंदी एंजिनिअर्स समाधानकारक काम करीत आहेत.

**तिबार पिकें काढण्यांत यश**—पश्चिम बंगालमधील दोन जिल्ह्यांत तीनदां पिकें काढण्याचा प्रयोग यशस्वी झाला आहे. अर्थात् हा प्रयोग आहे. अशा तऱ्हेनें तीन पिकें काढण्याचा प्रयोग मोठ्या प्रमाणावर यशस्वी झाला तर बंगालमधील ताग पिकविणाऱ्या शेतकऱ्याला चांगला नफा होण्याची शक्यता आहे. तथापि असें पीक काढण्यासाठी ट्यूब विहिरींची जरूरी असते.


# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

रजिस्टर्ड ऑफिस : ११७७, बुधवार पेठ, पुणें शहर

—: भांडवल :—

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | ... ... | रु. ३६,००,००० चे वर |
| गंगाजळी व इतर निधि | ... | रु. १७,१०,००० |
| खेळतें भांडवल | ... | रु. १८ कोटींचे वर |

★ महाराष्ट्र, आंध्र, म्हैसूर आणि मध्यप्रांतांत मिळून बँकेच्या ७८ शाखा

★ सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

★ स्टर्लिंग व डॉलर करन्सीमधील प्रवासी चेक्स विकत मिळतात

★ परदेशी लेटर्स ऑफ क्रेडिट उघडलीं जातात

— १९ जून, १९६१ पासून सुरू झालेल्या ५ नव्या शाखा —

सावंतवाडी, मालवण, कुडाळ, बांदा व फोंडा

— १ जुलै, १९६१ पासून सुरू झालेल्या ७ नव्या शाखा —

लक्ष्मीरोड, पुणें २, कँप, पुणें १, लोणावळा, खोपोली, बारामती, श्रीरामपूर, ओझर (ताम्हट)

जनरल मॅनेजर

## मोटारींच्या उत्पादनांत परदेशीय चलनाची अडचण

मोटारी तयार करणाऱ्या कारखानदारांनीं तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ह्या धंद्याच्या विस्तारासाठी ७० कोटी रुपयांच्या परदेशीय चलनाची मागणी केली होती. परंतु परदेशीय चलनाची दुर्मिळता लक्षांत घेऊन भारत सरकारनें फक्त ४३ कोटी रुपयांचें चलन मंजूर केलें आहे. त्यामुळें मंजूर झालेल्या परदेशीय चलनाच्या मर्यादेंत मोटारीच्या धंद्याचा विस्तार कसा करावा ह्याविषयीं भारत सरकार व कारखानदार ह्यांच्यांत आतां वाटाघाटी चालू झाल्या आहेत. सरकारच्या मतानें कारखानदारांनीं आंखलेल्या विस्ताराच्या योजना फार महत्त्वाकांक्षी आहेत. म्हणून त्यांची व्याप्ति कमी करणें जरूर आहे. शिवाय ह्या धंद्याला आतांच बाजारपेठांची अडचण भासू लागली आहे. मालवाहू मोटारी तयार करणाऱ्या दोन कारखानदारांनीं सरकारला असें कळविलें आहे, कीं तयार झालेल्या मालट्रक्स सर्वच्या सर्व विकल्या जात नाहींत. त्यामुळें उत्पादन कमी करून कामगार कमी करावे लागण्याचा संभव आहे. बाजारपेठेंतील ही घडामोड लक्षांत घेतां मोटारीच्या धंद्याचा विस्तार अधिक वास्तववादी दृष्टिकोनानें करणें सरकारला आवश्यक वाटत आहे. नाहींतर कारखानदारांना पुढील काळांत अडचणींना तोंड द्यावें लागेल असें सांगण्यांत येत आहे. कारखानदारांनीं आंखलेल्या विस्तारयोजनांत काटछाट करण्यांत आली तर ४३ कोटी रुपयांच्या परदेशीय चलनांतील कांहीं चलन शिल्लक राहण्याचा संभव आहे. त्याचा उपयोग करून सार्वजनिक मालकीच्या विभागांत लहान मोटारी तयार करण्याचा कारखाना काढतां येणें शक्य होईल. परदेशीय चलनाच्या मर्यादेंत राहून असा कारखाना काढतां येत असेल तर तो काढण्यास नियोजन समितीची ना नाहीं.

## तेलवहातुकीच्या मोठ्या बोटीची खरेदी

भारताच्या सागरी वहातुकीच्या बोटींत आणखी एका बोटीची भर पडली आहे. व्यापारी वहाभूक करणारी ही भारताजवळील सर्वांत मोठी बोट ठरेल. बोट तेल वहातूक करणारी असून तिचें वजन ३३,००० टन आहे. बोटीची मूळची बनावट नॉर्वेनें केली आहे. भारतांत नव्यानें स्थापन झालेल्या जयंती शिपिंग कंपनीनें ती २।। कोटी रुपयांना खरेदी केली आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत दर्यावर्दी वहातूक करणाऱ्या व्यापारी बोटींचें लक्ष्य ९ लाख टन ठरविण्यांत आलें होतें. नव्या बोटीच्या खरेदीनें हें लक्ष्य पार करण्यांत आलें आहे. बोटीचें नॉर्वेजिअन नांव बदलून तिला भारतीय नांव देण्यांत आलें आहे.

## छत्र्यांच्या निर्यातींतील घट

गेल्या कांहीं महिन्यांत भारतामधून निर्यात करण्यांत येणाऱ्या छत्र्यांच्या संख्येंत घट झाली आहे. १९५९ सालीं २३,००० डझन छत्र्या निर्यात करण्यांत आल्या होत्या. १९६० सालीं अवघ्या ४,७०० डझन छत्र्या निर्यात करण्यांत आल्या. १९६१ सालाच्या पहिल्या दोन महिन्यांत निर्यातींत थोडीशी सुधारणा झाली. परंतु त्यानंतर निर्यात पुन्हां झपाट्यानें कमी झाली. भारतामधील छत्र्या परदेशांत अंतर्गत किंमतीपेक्षा ५० टक्के कमी किंमतीला विकल्या जातात. छत्र्या तयार करण्यास लागणारें सामान आयात करण्याला परवाने देण्याबाबत सध्यां गोंधळाची परिस्थिति आहे. त्यामुळें छत्र्या निर्यात करणाऱ्या व्यापाऱ्यांना व उत्पादकांना तोटा सहन करावा लागत आहे. सरकारी धोरण स्पष्ट करण्याची मागणी धंदेवाल्यांनीं केली आहे.

## घरें बांधण्यासाठी आयुर्विमा कॉर्पोरेशनचीं कर्जें

तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत आयुर्विमा कॉर्पोरेशन ५० ते ६० कोटी रुपयांची रक्कम घरें बांधण्यासाठी कर्जाऊ म्हणून देऊं शकेल अशी माहिती कॉर्पोरेशनचे अध्यक्ष श्री. गोपालकृष्णन् ह्यांनीं जाहीर केली आहे. आयुर्विमा कॉर्पोरेशनच्या १९६० मधील कामासंबंधीं पत्रकार परिषदेंत बोलतांना ते पुढें म्हणाले कीं, गेल्या दोन वर्षांत आयुर्विमा कॉर्पोरेशननें घरबांधणीसाठी २३·५ कोटी रुपयांचीं कर्जें मंजूर केलेलीं आहेत. त्यांपैकी बराच मोठा हिस्सा राज्य-सरकारांना दिलेला आहे. देशाच्या कांहीं भागांत ह्या वर्षी पूर आले व त्यामुळें अनेक घरांचा नाश व पडझड झालेली आहे. पूरपीडित भागांत घरें बांधण्यासाठी कर्जें देण्याचा विचार कॉर्पोरेशन करीत आहे. महाराष्ट्र सरकारनें घरबांधणीच्या कामासाठी कॉर्पोरेशनकडे कर्जाची मागणी केलेली आहे. परंतु कर्जाचा नक्की आंकडा मात्र कळविलेला नाहीं. १९५० सालाच्या मानानें १९६० सालीं चालू विम्यांची संख्या तिपटीनें अधिक झाली आहे. त्या दृष्टीनें १९६० साल लक्षांत भरण्यासारखें आहे. १९५९ सालीं विमानिधी ४९५ कोटी रुपयांचा होता तो १९६० सालीं ५६० कोटी रुपयांचा झाला आहे. त्याचप्रमाणें विमा-कॉर्पोरेशनची मालमत्ता ५५४ कोटींवरून ६२२ कोटींपर्यंत वाढली आहे. १९५९ सालीं ४२९ कोटी रुपये दर्शनी किंमतीच्या नव्या विमा-पॉलिसीज देण्यांत आल्या, तर १९६० सालीं ४९८ कोटी रुपये दर्शनी किंमतीच्या नव्या पॉलिसीज देण्यांत आल्या. १९५९ सालीं कॉर्पोरेशननें ३५·०४ कोटी रुपयांची भांडवल गुंतवणूक केली होती. १९६० सालीं ६३·६२ कोटी रुपयांची भांडवल गुंतवणूक करण्यांत आली आहे. आयुर्विमा कॉर्पोरेशननें केलेल्या एकूण गुंतवणुकीपैकी सुमारें २१ टक्के गुंतवणूक खाजगी मालकीच्या क्षेत्रांत केली आहे.

## रबराचे सरकारी मालकीचे मळे

केरळ सरकारच्या अन्न व शेतकीखात्यानें असें जाहीर केलें आहे कीं, सार्वजनिक मालकीच्या विभागांत ४,००० एकरांत रबराची लागवड करण्याचें उद्दिष्ट ठेवण्यांत आलें होतें. परंतु प्रत्यक्षांत आणखी ५०० एकर जमिनींत रबराची लागवड करण्यांत आली आहे. त्याशिवाय खाजगी मालकांना ४,००० एकर जमीन रबराच्या लागवडीसाठी उपलब्ध करून देण्यांत आली आहे. सुमारें १,३६० छोट्या मळेवाल्यांना रबराच्या लागवडीसाठी जमीन देण्यांत आली. त्यांपैकी बहुतेकांनीं आपआपल्या जमिनीचा ताबा घेतला असून लागवडीच्या कामाला प्रारंभहि केला आहे. एकंदरींनें रबराच्या लागवडींत समाधानकारक वाढ होत आहे.

## सिनेमा नटीची प्रचंड प्राप्ति

सिनेमा तारकांची प्राप्ति जाहिरातीसाठी फुगवून सांगितली जाते, आणि कराच्यासाठी कमी करून दाखविण्यांत येते. तथापि अमेरिकन सिने-तारकांच्या खऱ्या उत्पन्नाचे आंकडे उपलब्ध झाले आहेत, त्यावरून एलिझाबेथ टेलर ह्या नटीला क्लेओपॅट्राचें काम करण्यासाठी ५० लक्ष रु. देऊं केल्याचें आढळतें. ह्या रकमेंतून ब्रिटिश मुख्य मंत्र्यांना ३५ वर्षें पगार देतां येईल, जज्जाला ४५ वर्षें नोकरीवर ठेवतां येईल, कमिशनर ऑफ पोलिसचा ५८ वर्षांचा पगार भागवितां येईल. एका बोलपटांतील कामाबद्दल एलिझाबेथ टेलरला मिळणारा मोबदला पार्लमेंटच्या २०० सभासदांच्या वार्षिक प्राप्तीइतका भरेल.

### निझामाबाद येथें कागदाचा कारखाना

निझामाबाद जिल्ह्यांत बोधन ह्या ठिकाणीं काढण्यांत येणारा कागदाचा नवा कारखाना खाजगी मालकीची राहणार आहे. निझाम शुगर फॅक्टरीमधील उसाच्या चिपाडाचा उपयोग करून ह्या ठिकाणीं सरकारी मालकीचा कागदाचा कारखाना काढण्याचा सरकारचा विचार होता. संकल्पित कागदाच्या कारखान्याच्या योजनेचा विचार करण्यासाठी तज्ज्ञांची एक समिती नेमण्यांत आली होती. परंतु ह्या ठिकाणीं कागदाचा कारखाना काढणें व्यवहार्य होणार नाहीं असा सल्ला कमिटीनें दिला. त्यानंतर राज्य सरकारनें सर्व योजना तपासण्यासाठी राज्य-सरकारच्या औद्योगिक विकासविषयक कॉर्पोरेशनकडे पाठविली. कारखान्याचा सर्व खर्च सरकार करणार असेल तरच हें काम हातीं घ्यावें असें मत कॉर्पोरेशननें व्यक्त केलें. पण सरकारची तशी तयारी नसल्यानें आतां योजना खाजगी उद्योगधंद्याच्या विभागांत घालण्यांत येण्याचा संभव आहे.

### दुसऱ्या महायुद्धांतील वरिष्ठ जर्मन कैदी

दुसरें महायुद्ध संपल्यानंतर हिटलरच्या सरकारमधील वरिष्ठांवर लष्करी न्यायालयांत खटले भरण्यांत येऊन त्यांना शिक्षा देण्यांत आल्या. ह्या वरिष्ठांपैकी तीन जर्मन कैदी अद्यापहि बर्लिनमधील स्पॅंडू ह्या तुरुंगांत शिक्षा भोगीत आहेत. युद्धाच्या अखेरच्या अवस्थेंत छत्रीच्या साह्यानें ब्रिटनमध्यें उतरण्याचें साहस करणारा रुडॉल्फ हेस, ह्या तिघांपैकी एक आहे. कैद्यांची बंदोबस्त ठेवण्यासाठी सालीना २ लाखांवर डॉलर्स खर्च करावे लागत आहेत. ह्या कैद्यांना सोडण्याबाबत ब्रिटन, रशिआ, फ्रान्स व अमेरिका ह्यांचें एकमत नाहीं. २० वर्षांच्या कैदेपैकी १६ वर्षे त्यांनीं तुरुंगवासांत काढलेलीं आहेत.

### पौर्वात्य देशांत पुस्तकांचा खप वाढविण्यासाठी ब्रिटिश प्रकाशनकंपनीची पुनर्घटना

लॉन्गमन्स, ग्रीन अॅन्ड कंपनी लि. या प्रसिद्ध ब्रिटिश कंपनीनें पौर्वात्य देश व आफ्रिका या भागांत आपल्या पुस्तकांचा खप वाढावा या उद्देशानें नवी दुय्यम कंपनी काढली आहे. या कंपनीचीं परदेशांत जाणारीं बहुसंख्य पुस्तकें शैक्षणिक स्वरूपाचीं असतात. त्याचप्रमाणें व्यावसायिक व तांत्रिक प्रकाशनांवर कंपनीचा भर आहे. इ. स. १७२४ सालीं स्थापन झालेल्या या ब्रिटिश प्रकाशनसंस्थेच्या जगभर शाखा आहेत.

### कॅमेऱ्यांच्या उत्पादनासाठी जपानचें सहकार्य

कलकत्ता येथील सरकारी मालकीच्या नॅशनल इन्स्ट्रुमेंटस लि. ह्या कारखान्यानें एका जपानी कारखान्याशीं कॅमेऱ्यांच्या उत्पादनासाठी तांत्रिक साह्याचा करार केला आहे. कराराची मुदत १० वर्षांची असून जपानी कंपनीचीं पेटंटस् भारतीय कंपनीला वापरतां येतील. संकल्पित हिंदी कारखान्यांत ३५ मिलिमीटरचे १,००० कॅमेरे दरमहा तयार होतील. जपानी कंपनी जपानमधील आपल्या कारखान्यांत भारतीय कामगारांना शिक्षण देण्याची व्यवस्था करील.

### इंडिअन एअरलाइन्स कॉर्पोरेशनचे दर

इंडिअन एअरलाइन्स कॉर्पोरेशननें आपले प्रवासी वहातुकीचे दर वाढविण्याचें ठरविले आहे. विमानांची दुरुस्ती, विमानाला लागणारें तेल आणि नौकरांचा पगार ह्या सर्वच बाबींचा खर्च वाढल्यामुळें प्रवासाचे दर वाढविणें कॉर्पोरेशनला भाग पडलें. तथापि कॉर्पोरेशनच्या प्रवासमार्गावर कोठेंहि १० टक्क्यांपेक्षा अधिक दर वाढणार नाहींत अशी दक्षता घेण्यांत आली आहे.


# भोर स्टेट बँक लि.

( स्थापना १९४४ )

मुख्य कचेरी :—भोर, जि. पुणें.

शाखा :—पुणें, पाली व शिरवळ

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | ... | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | ... | रु. ९१,००० |

*मुख्य कचेरींत भाड्यानें डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.*

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याज–वसुली, पेन्शन, कलेक्शन व बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात. बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी :— बुधवार घ. नं. ३६१–६२ पासोड्या विठोबानजिक. फोन नं. २५७६.

—अधिक माहितीसाठी लिहा—

—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—

श्री. म. त्र्यं. शिंगरे, अध्यक्ष

न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष

श्री. गो. बा. देवी

श्री. बा. ग. धंदुके



सेवा आणि सुरक्षितता यांसाठी

# दि बेळगांव बँक लिमिटेड

रजिस्टर्ड ऑफिस : रविवार पेठ, बेळगांव

स्थापना ) (शेड्यूल्ड बँक) ( १९३०

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रुपये | ८,००,००० |
| गंगाजळी | रुपये | ४,८६,००० |
| एकूण ठेवी | रुपये | १,७५,००,००० चे वर |

## बँक अल्प मुदतीच्या ठेवी

आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारते.

—आजच चौकशी करा—

होम सेव्हिंग्ज डिपॉझिटवर व्याज ३%

एक ते सहा वर्षे मुदतठेवीवर व्याज ४% ते ५%

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

अ. रा. नाईक,
बी. ए., बी. एसूसी., एल्एल्. बी.
मॅनेजिंग डायरेक्टर

## भारतांतील निरनिराळ्या भाषांतील वृत्तपत्रें

१९६० सालीं इंग्रजी भाषेंतील पत्रांची संख्या सर्वांत अधिक म्हणजे १,६४७ होती. त्या खालोखाल हिंदीचा (१,५३२) क्रम लागतो. ह्या दोन भाषांतील वृत्तपत्रांच्या संख्येची तुलनात्मक परिस्थिति १९५८ पासून कायम आहे.

इतर भाषांतील वृत्तपत्रांची संख्या पुढीलप्रमाणें:—मराठी–४०४; गुजराती–५१९; आसामी–१६; बंगाली–५२६; कानडी–२१०; मल्याळम–१९९; ओरिसा–७६; पंजाबी–२५६; संस्कृत–१२; तामिळ–३७७; तेलगू–२५६; उर्दू–६८०; द्विभाषिक–८२५; विविध भाषी–४८७. या भाषांखेरीज सिंधी, मणिपुरी, नेपाळी, इत्यादि भाषांतील १२५ वृत्तपत्रें होतीं.

राज्यनिहाय प्रकाशित होणाऱ्या वृत्तपत्रांचा विचार करतां महाराष्ट्रांत सर्वांत अधिक म्हणजे १,२७२ वृत्तपत्रें प्रकाशित होतात. इतर राज्यांचे आंकडे पुढीलप्रमाणें:—प. बंगाल–१,१०७; उत्तर प्रदेश–१,००३; आंध्र प्रदेश–३९०; आसाम–६१; बिहार–१९५; गुजरात–४४१; केरळ–३३९; मध्यप्रदेश–२४९; मद्रास–७८६; म्हैसूर–३१८; ओरिसा–१३९; पंजाब–५८४; राजस्थान–२५२; दिल्ली–८४४; हिमाचल प्रदेश–४; मणिपूर–२७; त्रिपुरा–१२; अंदमान निकोबार बेटें–३.

सन १९६० बाबतचीं वार्षिक पत्रकें ५,३७१ वृत्तपत्रांनीं सादर केलीं असून त्यांपैकी ४,६५१ वृत्तपत्रांनीं खपाबाबतची आंकडेवारी दिली आहे. या सर्व वृत्तपत्रांचा मिळून खप १८२·१९ लाख असा आहे. भाषानिहाय ही आंकडेवारी अशी:— इंग्रजी–४१·४७ लाख; हिंदी–३५·८३ लाख; आसामी–०·५२ लाख; बंगाली–९·३९ लाख; गुजराती–१२·०२ लाख; कन्नड–४·४९ लाख; मल्याळी–११·३० लाख; मराठी–१०·७१ लाख; उरिया–१·३४ लाख; पंजाबी–२·०३ लाख; संस्कृत–०·०७ लाख; तामीळ–२४·८६ लाख; तेलगू–६·३१ लाख व उर्दू–१०·५५ लाख.

सन १९६० मध्यें एक लक्षाहून अधिक खप असलेल्या दैनिकांची संख्या ६ होती. १९५९ मधील हाच आंकडा ४ होता. ५०,००० प्रतींवर खप असलेलीं दैनिकें १६ होतीं. या २२ दैनिकांपैकी ३ मराठी, ९ इंग्रजी, ३ हिंदी, २ तमिळ, १ तेलगु, २ मल्याळी आणि २ बंगाली भाषांतील होतीं. १९६० मध्यें ५३ नवीं दैनिकें निघालीं, त्यांपैकी १३ उर्दू व १२ हिंदी भाषेंतील होतीं.

## कापडाची निर्यात घटत चालल्यामुळें चिंता

अहमदाबादमधील घाऊक कापड व्यापाऱ्यांच्या संघटनेनें भारतामधून निर्यात करण्यांत येणाऱ्या कापडांत घट होऊं लागल्यामुळें चिंता व्यक्त केली आहे. संघटनेचे अध्यक्ष पूर्व आशिआंतील कापडाच्या बाजारपेठांना भेटी देऊन नुकतेंच परत आले आहेत. भारताच्या कापड निर्यात व्यापाराबद्दल बोलतांना ते म्हणाले कीं, निर्यात व्यापारांत बरींच दोषस्थानें आहेत. कापडाची निर्यात वेळेवर होत नाहीं; त्याच्या गासड्या नीट सुरक्षित रीतीनें बांधलेल्या नसतात; दाखविलेल्या नमुन्याप्रमाणें मालाचा पुरवठा होत नाहीं, इत्यादि दोषांचा त्यांनीं प्रामुख्यानें उल्लेख केला. शिवाय भारतीय कापडाच्या किंमतीहि इतर देशांच्या मानानें जास्त असतात असेंहि त्यांनीं सांगितलें. ह्या सर्वांचा परिणाम म्हणून सयाम, हाँगकाँग, सिंगापूर, सीलोन, इंडोनेशिआ, इत्यादि देशांतून रशिआ, चीन व जपान ह्यामधील कापड आयात करण्याची वृत्ति वाढत चालली आहे.

## डिझेल तेलावर चालणारीं रेल्वेचीं एंजिनें

तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत डिझेल तेलावर चालणारीं रेल्वेचीं एंजिनें तयार करण्याचा कारखाना काढण्याचा विचार रेल्वे खातें करीत आहे. रेल्वेखात्याचे उपमंत्री श्री. रामस्वामी ह्यांनीं ही माहिती वार्ताहरांना सांगितली. तिसऱ्या योजनेच्या कालांत भारताला अशा प्रकारचीं ५०० एंजिनें लागणार आहेत. त्यांपैकी कांहीं परदेशांतून आयात करण्यांत येणार असून बाकीचीं देशांतच बनविण्यांत येणार आहेत. भारतांत तयार करण्यांत आलेल्या रेल्वेच्या प्रवासी डब्यांची निर्यात सीलोनला व अर्जेंटायनाला करण्याबद्दल त्या देशांशीं वाटाघाटी चालू आहेत.

## सागरी वाहतुकीसाठी तीन नव्या बोटी

बाँबे स्टीम नॅव्हिगेशन कंपनीला मध्यवर्ती सरकारनें १·५ कोटी रुपयांचें कर्ज मंजूर केलें आहे. कोकणच्या किनाऱ्यावर वाहतूक करणाऱ्या कंपनीच्या सध्यांच्या तीन बोटी फार जुन्या झाल्या असल्यामुळें त्यांच्याऐवजीं नव्या बोटी घेणें आवश्यक झालें आहे. कंपनीला जपानकडून १९६२ च्या प्रारंभीच्या तिमाहींत तीन बोटी मिळणार होत्या. परंतु आतां बोटी बांधण्याची मागणी युगोस्लाव्हिआकडे नोंदण्यांत आली आहे. जपाननें भारताला दिलेल्या कर्जाचा उपयोग अधिक तांतडीच्या कामासाठी करतां यावा म्हणून हा बदल करण्यांत आला.

## खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या कक्षेंत येणाऱ्या सहकारी संस्थांचे सेवकवर्गासाठी भरविलेल्या वर्गाचा जून १९६१ मध्यें झालेल्या

## परीक्षेचा निकाल.

पहिला वर्ग:—के. टी. चौधरी, जे. टी. वाणी.

दुसरा वर्ग:—बी. बी. गवळी, एन्. डी. कुंभार, एल. के. क्षीरसागर.

तिसरा वर्ग:—एम्. जे. होलमुखे, एस. बी. काळे, ए. एस. काझी, बी. टी. कुंभार, के. आर. माळी, मालती पी. परदेशी, ए. के. पाटील, एन्. एन्. पाटील, पी. एन्. फालक, एस. जी. सावरकर, बी. व्ही. शेवाळे.

स. रं. जोग
प्राचार्य.
पुणें सहकारी विद्यालय

## भूतारण बँकांच्या सेवकवर्गाचा शिक्षणवर्ग, जुलै १९६१

## परीक्षेचा निकाल.

पहिला वर्ग:—जी. एस. कुलकर्णी, एस. एल. अंबुलगे, डी. टी. पाटील, एस. बी. देशपांडे, डी. व्ही. देशपांडे, ओ. जी. पाटील, व्ही. एम्. पाटील, एस. वाय. वाटील, एस. टी. शिंपी.

दुसरा वर्ग:—एम्. व्ही. मुंडुगले, एन्. के. साळुंके, व्ही. व्ही. धवाने, आर. जे. देशमुख, यू. डी. पाटील, टी. एस. गरूड, एस. डी. न्हावी, बी. बी. पाटील, जी. पी. हिंगमिरे, बी. एच. पाटील, एस. एन्. चौधरी, ए. एच. पाटील.

तिसरा वर्ग:—एस. एन. पाटील, ए. एम्. सरमळकर, आर. वाय. कुलकर्णी, व्ही. बी. सूर्यराव, जे. ए. बने, एस. डी. देशमुख, जी. बी. बोरसे, पी. व्ही. डहाळे, एम्. बी. चौधरी, नलिनी सामंत, डी. जी. काळे, एम. एस. वाघमारे.

स. रं. जोग
प्राचार्य.
पुणें सहकारी विद्यालय

## बँक-ठेवींच्या विम्याचें बिल

### १,५०० रु. ची मर्यादा; कोणती बँक इन्शुअर्ड होणार!

डिपॉझिट इन्शुअरन्स कॉर्पोरेशनची स्थापना करणारें एक बिल अर्थमंत्री, श्री. मुरारजी देसाई, ह्यांनीं लोकसभेंत मांडलें आहे. ह्या कॉर्पोरेशनच्या योजनेंतील महत्त्वाच्या बाबी खालीं दिल्या आहेत :—

( १ ) रिझर्व्ह बँकेच्या पूर्ण मालकीची ती सबसिडिअरी असेल.

( २ ) तिचें मूळ भांडवल १ कोटि रु. असेल.

( ३ ) व्यापारी बँकांतील ठेवींचा विमा ती उतरवील. स्टेट बँक व तिच्या सबसिडिअरी बँकांतील ठेवींचाहि विमा उतरला जाईल. मध्यवर्ती सरकार, राज्य सरकार, किंवा विदेशी सरकार आणि विमा उतरलेल्या बँका ह्यांनीं स्टेट बँकेंत ठेवलेल्या ठेवींचा विमा उतरला जाणार नाहीं.

( ४ ) विम्याची कमाल मर्यादा १,५०० रु. राहील. पण सरकारच्या पूर्वमंजुरीनें कॉर्पोरेशन ती वाढवूं शकेल.

( ५ ) सरकारच्या पूर्वमंजुरीनें विम्याच्या हप्त्याचे दर कॉर्पोरेशन ठरवील. दर साल दर शेंकडा १५ नये पैसे ह्या कमाल दराची तरतूद बिलांत करण्यांत आली आहे.

( ६ ) बँक लिक्विडेशनमध्यें गेली, किंवा कॉम्प्रमाइज्, अॅरेंजमेंट अथवा अमलगमेशन ह्याबाबत एखादी योजना अमलांत आली, म्हणजे कॉर्पोरेशनवरील जबाबदारी निर्माण होईल व ती पार पाडण्यांत येईल.

( ७ ) कॉर्पोरेशनच्या बोर्डाचा चेअरमन रिझर्व्ह बँकेचा गव्हर्नर हा असेल. इतर चार संचालकांत रिझर्व्ह बँकेचा डेप्युटी गव्हर्नर, मध्यवर्ती सरकारचा एक अधिकारी आणि मध्यवर्ती सरकारनें नियुक्त केलेले दोन बिनसरकारी अनुभवी गृहस्थ असतील.

( ८ ) कायदा अंमलांत येण्याचे वेळीं यथायोग्य चालू असलेली प्रत्येक बँक इन्शुअर्ड बँक म्हणून नोंदली जाईल. प्रत्येक नवी बँक तिला लायसेन्स मिळाल्यावर ३० दिवसांचे आंत अशाच प्रकारें नोंदण्यांत येईल. कायदा अंमलांत येण्याचे वेळीं तथायोग्य चालू नसलेली बँक पुढें व्यवस्थित कारभार करूं लागली, तर तिला इन्शुअर्ड बँकेचा दर्जा प्राप्त होईल; अशी नोंदणी रद्द करण्याचीहि तरतूद बिलांत केलेली आहे.

( ९ ) पहिलीं पांच वर्षे कॉर्पोरेशनला इनकम् टॅक्स, वगैरे माफ होईल. कॉर्पोरेशननें आपला सर्व उर्वरित नफा एक अगर अधिक रिझर्व्ह फंडांत टाकला पाहिजे.

( १० ) इन्शुअर्ड बँक लिक्विडेशनमध्यें गेल्यावर किंवा तिचें अमलगमेशन झाल्यावर पांच महिन्यांचे आंत ठेवीदारांना विम्याची रकम वर्ग केली जाईल.

( ११ ) भारताबाहेर मिळविलेल्या ठेवींना विम्याचें संरक्षण मिळणार नाहीं.

( १२ ) कॉर्पोरेशन दोन प्रकारचे फंड ठेवील. (अ) डिपॉझिट इन्शुअरन्स फंड आणि ( ब ) जनरल फंड.

विम्याचे हप्ते, लिक्विडेटरकडून मिळालेल्या रकमा, रिझर्व्ह बँकेनें कर्जाऊ दिलेल्या रकमा, जनरल फंडांतून वर्ग केलेल्या रकमा, गुंतवणुकीवर मिळालेलें व्याज, हीं सर्व डिपॉझिट इन्शुअरन्स फंडांत समाविष्ट होतील. ठेवींच्या विम्याबाबत ठेवीदारांना द्याव्या लागणाऱ्या रकमा आणि कर्जफेड ह्या फंडांतून होईल; बाकीचा पैसा जनरल फंडांत जाईल.

( १३ ) कॉर्पोरेशनला तात्काळ जरूर नसलेले, दोन्ही फंडांतील पैसे मध्यवर्ती सरकारच्या रोख्यांत गुंतवले जातील. बाकी सर्व पैसे रिझर्व्ह बँकेंत ठेवले जातील.

डिपॉझिट इन्शुअरन्सचा हप्ता किती बसेल, ह्याची कल्पना येण्यासाठी आम्हीं महाराष्ट्र बँकेचें उदाहरण देत आहों. हप्त्याचा कमाल दर दरसाल दर शेंकडा १५ नये पैसे आहे. आरंभीं तो ५ नये पैसे असेल असें गृहीत धरलें, तर महाराष्ट्र बँकेला दरसाल १,००,००० रु. हप्त्यासाठी द्यावे लागतील. यथायोग्य चालू असलेल्या बँकांकडील (which may be functioning normally) ठेवींचा विमा उतरला जाईल, ह्याचा अर्थ रिझर्व्ह बँकेचा लायसेन्स असलेल्या बँकाच फक्त विम्याच्या कक्षेंत येतील असा केला जातो. डॉक्टरी तपासणी करून ज्यांची शरीरप्रकृति नॉर्मल आढळेल, त्यांच्याच विमा स्वीकारला जातो; बँकांच्या बाबतींत तेंच तत्त्व लागूं केलें जाणार, हें उघड आहे.

### गुप्त तरतुदींचा तपशील देण्याची बँकांवर सक्ती करतां येणार नाहीं

बँकिंग कंपन्यांच्या कायद्याच्या ३४-अ कलमान्वयें, बँकांना त्यांचे कांहीं रिझर्व्ह फंड आणि बुडीत व संशयित रिझर्व्ह फंड ह्यांची माहिती प्रगट करण्याची सक्ती करतां येत नाहीं. नॅशनल इंडस्ट्रिअल ट्रायब्यूनल ( बँक डिसप्यूट्स ) नें हें कलम कायदेशीर ठरविलें होतें. त्या निर्णयावर ऑल इंडिया बँक एम्प्लॉईज असोसिएशननें सुप्रिम कोर्टाकडे अपिल केलें होतें, तें फेटाळण्यांत आलें आहे.

बँका आणि त्यांचे नोकर ह्यांचेमधील तंटे नॅशनल ट्रायब्यूनलकडे मार्च १९६० मध्यें सोंपविले होते. देशांतील बहुतेक मोठ्या बँका, रिझर्व्ह बँक आणि स्टेट बँक सुद्धां, ह्यांत पक्षकार आहेत. ट्रायब्यूनलचें काम सुरू झाल्यानंतर बँक एम्प्लॉईज असोसिएशननें बँकांचे गुप्त रिझर्व्हझ आणि तरतुदी यांच्या तपशिलाची मागणी केली. हा तपशील देण्यास आम्ही बांधलेलों नाहीं, असें बँकांचें म्हणणें होतें; तर असा तपशील नाकारणें राज्य-घटनेंतील तरतुदींशीं विसंगत आहे, तपशीलाच्या अभावीं बँकांची नोकरांचा पगार देण्याची शक्ति अजमावतां येणार नाहीं, असें नोकरांचेतर्फे मांडण्यांत आलें होतें.

### काथ्याच्या धंद्याचें यांत्रिकीकरण

केरळ राज्यांतील काथ्याच्या धंद्यासंबंधीं विचार करण्यासाठी दिल्ली येथें बैठक भरविण्यांत आली होती. काथ्याच्या धंद्यांतील व्यापारी व मजुरांचे प्रतिनिधी बैठकीस उपस्थित होते. त्याशिवाय मध्यवर्ती सरकारचे उद्योगमंत्री श्री. मनुभाई शहा व केरळचे उद्योगमंत्री श्री. मेनन ह्यांनींहि बैठकीच्या कामकाजांत भाग घेतला. काथ्याच्या मालाच्या निर्यातीमुळें भारताला बरीच मोठी परदेशीय हुंडणावळ मिळते. ह्या धंद्याची कार्यक्षमता व उत्पादन वाढविण्यासाठी यंत्रांचें अधिक साह्य घेण्यांत यावें असें मत बैठकींत व्यक्त करण्यांत आलें. परदेशी बाजारपेठांत काथ्याच्या मालाला अलीकडे कठीण परिस्थितीला तोंड द्यावें लागत आहे. परदेश भारताकडून कच्चा काथ्या विकत घेऊन त्यापासून अधिक चांगला माल तयार करतात. त्यामुळें भारताच्या पक्क्या मालाची गिऱ्हाइकी घटत चालली आहे.

### मेट्टूर टनेल इलेक्ट्रिसिटी प्रोजेक्ट

मद्रास राज्यांतील मेट्टूर टनेल इलेक्ट्रिसिटी प्रोजेक्टसाठी रशिआची मदत मिळविण्यांत आली आहे. ह्या योजनेसाठी लागणारी यंत्रसामग्री पुरविण्याचें रशिआनें मान्य केलें आहे. लागणारी यंत्रसामग्रीची किंमत २.१६ कोटी रुपये होईल. योजना पुरी झाल्यावर मद्रास राज्याला १ लाख किलोवॅट वीज अधिक मिळूं लागेल. रशिआ जरूर ती यंत्रसामग्री दोन वर्षांत देणार आहे.

## रेल्वेवाहतुकींत अपेक्षित वाढ

सन १९६५–६६ मध्यें रेल्वेनें २४·५ कोटी टन मालाची वाहतूक करावी लागेल असा अंदाज बांधून रेल्वेची तिसरी पंचवार्षिक योजना तयार करण्यांत आली आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस रेल्वेनें मालाची जी उलाढाल केली त्यापेक्षा ९·१ कोटी टनांनीं हा आंकडा अधिक आहे. मालवाहतुकींत जी ९·१ कोटी टनांनीं वाढ अपेक्षित आहे त्यांपैकी ७·९५ कोटी टन कोळसा, पोलाद, पोलाद, कारखान्यास लागणारा कच्चा माल, सिमेंट, निर्यातीसाठी लागणारें अशुद्ध लोखंड, इ. स्वरूपाची असेल. बाकीचा १·१५ कोटी टन माल सर्वसाधारण स्वरूपाचा असेल. गेल्या दहा वर्षांत देशाच्या आर्थिक व्यवहारांत जी झपाट्यानें वाढ झाली त्यामुळें वाहतूकयंत्रणेवर विशेष भार पडला आहे. यांपैकी बराचसा भार अर्थात्च रेल्वेवर पडला असून पहिल्या योजनेच्या प्रारंभीं रेल्वेकडून होत असलेल्या वाहतुकीशीं तुलना करतां, रेल्वेकडून होणारी मालवाहतूक १०० टक्क्यांनीं व उतारू वाहतूक २७ टक्क्यांनीं वाढली आहे.

पहिल्या व दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत मिळून चार चाकी वाघिणींची संख्या २,२२,४४१ वरून वाढून ३,४१,०४१ वर गेली. तर डब्यांची (युनिट) संख्या २०,५०२ वरून वाढून २८,१७१ वर गेली. याच मुदतींत रेल्वे इंजिनांची संख्या ८,४६१ वरून वाढून १०,५५४ वर गेली. तसेंच या दोन योजनाकाळांत १,३०० मैल लांबीच्या रेल्वेमार्गाचें दुहेरीकरण तर ८०० मैल रेल्वेमार्गाचें विद्युतीकरण करण्यांत आलें. १,२०० मैलांचे नवे मार्ग टाकण्यांत आले तर युद्धकाळांत काढून टाकलेले ४०० मैलांचे रेल्वेमार्ग पुन्हा टाकण्यांत आले.

रेल्वेच्या मालवाहतुकींत १९५०–५१ मधील ९·१५ कोटी टनांवरून वाढ होऊन ती १९६०–६१ मध्यें १५·४ कोटी टनांवर गेली. मालाच्या वाहतुकीचें हें प्रमाण ६९ टक्क्यांनीं वाढलें तर टन–मैलांत विचार करतां वाहतुकींतील ही वाढ १०० टक्के भरते.

---

### मुक्त व्यापार विभाग

कांडला येथें भारतामधील पहिला मुक्त व्यापार विभाग स्थापन करण्यांत येणार असून त्याची व्याप्ति मुख्य बंदरापासून ५ मैलांपर्यंत असेल. प्रारंभीं हा विभाग ६०० एकर जागेवर पसरलेला असेल. परंतु व्यापाराच्या वाढीबरोबर विभागाची व्याप्ति ५,००० एकरांपर्यंत वाढवितां येण्यास अवसर ठेवलेला आहे. भारत सरकारचे खास अधिकारी श्री. जी. एल्. मेहता ह्यांनीं ही माहिती गुजरात चेंबर ऑफ कॉमर्सच्या सभासदांना सांगितली.


दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९४५ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७२९००

बचतीच्या आकर्षक योजना

| | |
|---|---|
| ( १ ) स्पेशल सेव्हिंग | व्याजाचा दर २॥ टक्के |
| ( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत | ,, ३। ,, |
| ( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें | ,, ५ ,, |

*मुदतीच्या ठेवींच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.*

मॅनेजर—ना. शं. कानिटकर

भारतांतील प्रमुख नागरी सहकारी बँक

दि सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

[ टेलि. : २७०१४ सारस्वत बँक-गृह, मुंबई ४. [ स्थापना : १९१८

| | | लाख |
|---|---|---|
| शेअर भांडवल : | रु. | १०·०० |
| वसूल भांडवल | रु. | ८·९२ |
| रिझर्व्ह व इतर फंडस् : | रु. | १०·४० |
| ठेवी : | रु. | १५१·७२ |
| खेळतें भांडवल : | रु. | १८०·८८ |

शाखा : फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणें व बेळगांव.

*महिला शाखा :* सारस्वत बँक–गृह, निकदवारी लेन, मुंबई ४.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.